# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद- ४३१ ००४ महाराष्ट्र (भारत)

(नॅक समितीतर्फे अ दर्जा प्राप्त)

ई.पी.ए.बी.एक्स. :- (०२४०) २४०३३९९ ते ४००
कार्यालय दूरध्वनी :- (०२४०) २४०३१०७
कुलसचिव (का). :- (०२४०) २४०३३३३
कुलसचिव (नि). :- (०२४०) २४००२०३
फॅक्स :- (०२४०) २४०३११३ / २४०३३३५
तार :- बामुसिटी
Web Site :- www.bamu.ac.in
E-mail :- vc@bamu.net
E-mail :- registrar@bamu.ac.in

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद - ४३१ ००४
(महाराष्ट्र)

संदर्भ क्र.सा.प्र./२०२२/ 394

दिनांकः- २८-०९-२०२२

**'निवडणूक काम प्राधान्य'**

**मा. संचालक,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**उपपरिसर उस्मानाबाद.**

विषयः- **आक्षेप/ दुरुस्ती अर्ज स्वीकृती केंद्र म्हणून जबाबदारी सोपविल्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयी मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार कळविण्यात येते की, विद्यापीठाने तात्पुरत्या मतदार याद्या दि. २६-०९-२०२२ रोजी जाहीर केल्या आहेत. सदरील याद्यांबाबत आक्षेप/ दुरुस्ती सादर करावयाची असल्यास दि. ३०-०९-२०२२ रोजीपर्यंत सायं. ०५.०० वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

तात्पुरत्या मतदार याद्यासंदर्भात आक्षेप/दुरुस्ती सादर करण्यासाठी अर्जदारांना विद्यापीठ निवडणूक विभाग येथे प्रत्यक्ष किंवा खास दुतामार्फत सादर करण्याचे कळविले आहे. तथापि, उस्मानाबाद येथील अर्जदारांना विहित मुदतीत विद्यापीठ निवडणूक विभाग येथे उपस्थित होणे गैरसोयीचे ठरत आहे.

करिता, तात्पुरत्या मतदार यादीवर आक्षेप/ दुरुस्ती स्वीकारण्यासाठी उपपरिसर उस्मानाबाद येथे "आक्षेप/ दुरुस्ती अर्ज स्वीकृती केंद्र" म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

सबब, आक्षेप/ दुरुस्ती अर्ज दि. ३०-०९-२०२२ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्याची तसेच स्वीकारलेले अर्ज त्याचदिवशी उपपरिसर उस्मानाबाद येथून खास दुतामार्फत विद्यापीठ निवडणूक विभागास सादर करण्याची जबाबदारी आपणावर सोपविली आहे.

RSuryawanshi

**कुलसचिव तथा**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

प्रतः-
१) वित्त व लेखा अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
२) मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
३) मा. प्र-कुलगुरूंचे स्वीय सहायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद